निवडसुची वर्ष २०२५-२०२६ मध्ये तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना उप जिल्हाधिकारी संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेली पदोन्नती नाकारल्यामुळे पदोन्नती आदेश रद्द करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र.पदोन्न-०३२६/प्र.क्र. ६४/आस्था-२ (१५९३१२६)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ०७ एप्रिल, २०२६.

**संदर्भ**:- १) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१

२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. पदोन्नती-१०२५/प्र.क्र. २४६/८१/आस्था-२ दि.११.११.२०२५.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र३०३/का.१२, दि.१२.०९.२०१६.

४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.०१.०४.२०१०.

**शासन आदेश** :-

उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ येथील शासन आदेशान्वये सन २०२५-२६ या वर्षाच्या निवडसूचीकरीता तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने तहसिलदार संवर्गातील श्री. राहूल अर्जुनराव सारंग यांना वेतनश्रेणी एस-१९- (रू. ५५१००-१७५१००) मधून उप जिल्हाधिकारी संवर्गात वेतनश्रेणी एस-२०- (रू. ५६१००-१७७५००) या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. तथापि, श्री. राहूल अर्जुनराव सारंग यांनी दि. १६.०२.२०२६ रोजीच्या अर्जान्वये उप जिल्हाधिकारी संवर्गातील पदोन्नती नाकारली असल्याने संदर्भ क्र.३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. राहूल अर्जुनराव सारंग यांची पदोन्नती रद्द करण्यात येत आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | से.ज्ये. क्र. | महसूल विभाग वाटप | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री. राहूल अर्जुनराव सारंग | २२११ | नागपूर | उप जिल्हाधिकारी (रोहयो), गोंदिया, जि. गोंदिया | पदोन्नती नाकारली आहे |

२. श्री. राहूल सारंग यांनी पदोन्नती नाकारली असल्याने संदर्भ क्र.३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. राहूल अर्जुनराव सारंग यांचे नाव सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून वगळण्यात येत आहे.

३. श्री. राहूल सारंग यांनी पदोन्नती नाकारली असल्याने संदर्भ क्र.३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. सारंग यांचा पुढील २ वर्षांमध्ये होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये समावेश केला जाणार नाही.

४. श्री. राहूल सारंग यांना सन २०२५-२६ व त्या पुढील दोन वर्षात होणाऱ्या निवडसूचीतील अधिकाऱ्यांचा मानीव दिनांक प्राप्त होणार नाही.

५. श्री. राहूल सारंग यांना पदोन्नती नाकारली असल्याने जर त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला असेल तर वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.०१.०४.२०१० मधील तरतूदीनुसार विभागीय आयुक्त, पुणे यांनी त्यांचे स्तरावरून उचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तात्काळ शासनास सादर करावा.

६. श्री. राहूल सारंग हे दि.१४.११.२०२५ पासून गैरहजर असल्याने श्री. सारंग यांचा दि.१४.११.२०२५ ते दि.१५.०२.२०२६ हा गैरहजेरीचा कालावधी असाधारण रजा म्हणून ग्राह्य धरण्यात यावा.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०४०७१९०३३३३५१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.07 19:06:50 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, पुणे/नागपूर विभाग.
२. श्री. राहूल अर्जुनराव सारंग, तहसिलदार

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, आणि अल्पसंख्यांक विकास व औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
७. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
८. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,महाराष्ट्र राज्य
९. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ मुंबई /नागपूर
११. अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१३. संबंधित अधिकारी  (विभागीय आयुक्त, कार्यालयामार्फत)
१४. सह सचिव (कार्यासन-१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५. निवड नस्ती (कार्यासन आस्था-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.